**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २१ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी ६५ टक्क्यांहून अधिक मतदान, १९९५ नंतर पहिल्यांदा एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदारांचा उत्साह.**
2. **कृषी प्रदर्शन ‘ॲग्रोव्हिजन’चे उदया डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ-पीडीकेव्ही ग्राउंड, दाभा येथे होणार उद्घाटण -25 नोव्हेंबरपर्यंत विविध कार्यशाळेचे आयोजन.**
3. **सीबीएसईच्या १० वी आणि १२ वी च्या परीक्षा १५ फेब्रुवारीपासून.**
4. **55 व्या इफ्फी महोत्सवात प्रसार भारतीच्या वेव या नवीन OTT मंचाचे उद्घाटन.**

**मतदान टक्केवारी**

विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाकडून आतापर्यंत मिळालेल्या आकडेवारीनुसार राज्यात ६५ टक्क्यांहून अधिक मतदान झालं. निवडणूक आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार आज रात्रीपर्यंत मतदानाची अंतिम टक्केवारी हाती येईल. त्यानुसार या टक्केवारीत आणखी १-२ टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदा राज्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदान झालंय. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत ७१ पूर्णांक ६९ टक्के मतदारांनी मताधिकार बजावला होता. राज्यात सर्वाधिक सव्वा ७६ टक्के मतदानाची नोंद कोल्हापूर जिल्ह्यात झाली. अहिल्यानगर, बुलडाणा, चंद्रपूर, गडचिरोली, हिंगोली, जालना, परभणी, सांगली, सातारा या जिल्ह्यांमध्येही ७० टक्क्यांपेक्षाही जास्त मतदानाची नोंद झाली. सर्वात कमी ५२ टक्के मतदान मुंबई शहर या जिल्ह्यात नोंदवलं गेलं. मुंबई उपनगर जिल्ह्यात ५५ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. ठाण्यात ५६ टक्के मतदान झालं. हे ३ जिल्हे वगळता इतरत्र ६० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं. मतदारसंघाचा विचार करता चंद्रपूरच्या चिमूर आणि कोल्हापूरच्या कागलमध्ये ८१ टक्क्यांपेक्षा जास्त मतदारांनी मतदान केलं. राज्यातल्या २७ पेक्षा जास्त मतदारसंघात ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदानाची नोंद झाली. सर्वात कमी ४४ पूर्णांक ४९ टक्के मतदान कुलाबा मतदारसंघात झालं. अंबरनाथ, मुंबादेवी, धारावी आणि भिवंडी पूर्वमध्ये ५० टक्क्यांपेक्षाही कमी मतदान झालंय. दरम्यान, राज्याच्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीत कोल्हापूर जिल्ह्यानं आघाडी घेतली असली तरी गडचिरोली जिल्ह्यानं सर्व राज्याचं लक्ष वेधून घेतलं. आदिवासी बहुल जिल्हा असून सुमारे ३८ टक्के जनता ही आदिवासी समाजाची आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीनं नटलेला हा भूप्रदेश असला तरी नक्षलवादी कारवायांमुळे हा भाग विकासापासून वंचित राहिला आहे. इथल्या जनतेला विकासाचं महत्त्व पटवून देण्यात आलं आणि बंदुकीच्या गोळीला मतदानानं उत्तर देण्याचं आवाहन त्यांना करण्यात आलं, त्यामुळे संदेशाचा सकारात्मक परिणाम दिसून आला, अशी माहिती इथल्या अधिकाऱ्यांनी दिली. गेल्या काही वर्षात झालेल्या विकासकामांचे फायदे नागरिकांना दिसून आले. त्यामुळंही त्यांनी मतदानात मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.

**पुरस्कार**

पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांना काल गयाना देशातला सर्वोच्च सन्मान ‘द ऑर्डर ऑफ एक्सलन्स’ प्रदान करण्यात आला. मोदी यांचं दूरदृष्टी असलेलं नेतृत्व, जागतिक पातळीवर

विकसनशील देशांच्या हक्कांना त्यांनी मिळवून दिलेलं व्यासपीठ, आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या समुदायासाठी त्यांचं उल्लेखनीय कार्य आणि भारत-गयाना देशांमधले संबंध अधिक दृढ करण्यासाठीची त्यांची कटिबद्धता आदीं साठी मोदी यांना या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. गयानाच्या स्टेट हाऊस मध्ये एका समारंभात गयानाचे अध्यक्ष डॉ.मोहम्मद इरफान अली यांच्या हस्ते मोदी यांना या पुरस्कारानं गौरवण्यात आलं. हा सन्मान दोन्ही देशातल्या नागरिकांमध्ये रुजलेल्या ऐतिहासिक संबंधांना समर्पित करत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. हा दौरा म्हणजे परस्पर देशातली मैत्री अधिक दृढ करण्याचा भारताच्या कटिबध्दतेचा पुरावा असल्याचं ते म्हणाले. भारत-गयाना मधले संबंध सामायिक इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि उभय देशांचा परस्परांवरचा विश्वास यावर आधारित असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

**हुतात्मा स्मृती**

आजच्या म्हणजेच २१ नोव्हेंबर रोजी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०५ जणांनी हौतात्म्य पत्करल होत. त्यांच्या या हौतात्म्याच स्मरण म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईतल्या हुतात्मा स्मारकाला भेट देऊन शहीद हुतात्म्यांच्या स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केल. यावेळी मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर आणि उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा हेही उपस्थित होते. राष्ट्रवादी शरद्चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही हुताम्यांना आदरांजली वाहिली आहे.मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी आपल्या प्राणांच बलिदान दिलेल्या सर्व हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन! अस त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरील पोस्टमध्ये म्हटल आहे .

**ॲग्रोव्हिजन**

मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन ‘ॲग्रोव्हिजन’ चे उद्घाटन उद्या 22 नोव्हेंबर शुक्रवार रोजी सकाळी 10.30 वाजता डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ- पीडीकेव्ही ग्राउंड, दाभा येथे होणार आहे. उद्घाटनानंतर मुख्य सभागृहात 12 वाजता ‘विदर्भातील दुग्धव्यवसाय वाढीच्या संधी’ विषयावर महत्वाची परिषद होईल. भारतातील कृषी उत्पादनांचे उत्पादन करणाऱ्या अनेक नामवंत कंपन्या, संशोधन संस्था, सरकारी विभाग, विविध राज्ये, कृषी विद्यापीठे, प्रगत कृषी तंत्रज्ञान, संशोधन आणि सेवा क्षेत्रातील आघाडीच्या संस्थाचा यात सहभागी राहणार आहे. आयआयटी खरगपूर, एफटीपीआयचे स्टार्टअप्स तसेच, माहिती तंत्रज्ञानाचे स्वतंत्र स्टॉल्स राहणार असून ड्रोनची प्रात्यक्षिके देखील बघायला मिळतील. या प्रदर्शनाची यावर्षीची संकल्पना शेतकरी सक्षमीकरणासाठी यंत्र,तंत्र आणि व्यापार वाढीचे मंत्र अशी राहणार आहे.400 हून आधी कंपन्यानी आपला सहभाग ॲग्रो व्हिजन मधे निश्चित केला आहे. यावर्षीच्या ॲग्रो व्हिजन मध्ये एकूण ४१ विविध विषयावर कार्यशाळा आयोजित केल्या जातील. या कार्यशाळांमध्ये शेतकऱ्यांना देशभरातील तज्ञांचे मार्गदर्शन आणि यशस्वी शेतकऱ्यांकडून शिकण्याची अनोखी संधी मिळेल. यात कृषी क्षेत्रात ड्रोनचा वापर, फुलशेती, भाजीपाला बियाणे उत्पादन, हळद आणि आलं लागवड प्रक्रिया,बांबू लागवड, औषधी वनस्पती लागवड तंत्रज्ञान, कृषी रसायनांचा योग्य वापर, तेलबिया उत्पादन, रेशीम शेती, शेळी मेंढी पालन,मधमाशी पालन, नैसर्गिक शेती, विदर्भातील ॲग्रो टुरिझमच्या संधी कुक्कुटपालन यासारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश आहे.शेतकरी, उत्पादक, ग्राहक, कृषी विद्यार्थी आणि कृषीप्रेमींनी ॲग्रोव्हिजनला भेट द्यावी तसेच, शेतकऱ्यांनी कार्यशाळा व परिषदांचा लाभ घ्यावा,

असे आवाहन ॲग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ.सी.डी. मायी, आयोजन सचिव रवी बोरटकर आणि समिती सदस्यांनी केले आहे.

**सीबीएसई परिक्षा**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या बोर्डाची परीक्षा १५ फेब्रुवारी पासून सुरु होणार असल्याची घोषणा आज सीबीएसईनं केली. दहावी बोर्डाच्या परीक्षा १८ मार्चला तर बारावीच्या परीक्षा ४ एप्रिल रोजी संपतील. सीबीएसईनं यावर्षी पहिल्यांदाच परीक्षेच्या ८६ दिवस आधीच वेळापत्रक जाहीर केलं असून प्रत्येक विषयाच्या परीक्षेमध्ये पुरेसा अवधी राखण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय बारावीच्या परीक्षांचं वेळापत्रक विविध प्रवेश परीक्षांच्या तारखा लक्षात घेऊन ठरवण्यात आल्या आहेत. एका दिवशी कोणत्याही दोन विषयांची परीक्षा येऊ नये, याची काळजी घेऊन ४०हजार विषयांच्या पर्यायांची पडताळणी करून बोर्डानं हे वेळापत्रक तयार केलं आहे.

**बिटकॉईन**

सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेनं बिटकॉईन घोटाळ्यांतर्गत अमित भारद्वाज, अजय भारद्वाज आणि इतरांविरुद्ध तक्रार नोंदवली आहे. या तक्रारीनुसार, आरोपींनी ८० हजार बिटकॉईनच्या माध्यमातून ६ हजार ६०६ कोटी रुपयांचा निधी नऊ परदेशी कंपन्यांद्वारे परदेशात मालमत्ता खरेदी करण्यासाठी वळवला. या प्रकरणी गौरव मेहता यालाही काल समन्स बजावण्यात आलं आहे. राज्य विधानसभा निवडणुकीच्या आदल्या दिवशी निवृत्त पोलीस अधिकारी रविंद्रनाथ पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांच्यावर क्रिप्टोचलन फसवणूक प्रकरणात गुंतल्याचा आरोप केल्यानंतर हे प्रकरण चर्चेत आलं.

**ओटीटी मंच-वेव**

गोव्यामध्ये सुरु असलेल्या 55 व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी आज प्रसार भारती या राष्ट्रीय सार्वजनिक प्रसारण माध्यमाच्या WAVES (वेव्स), या OTT मंचाचे उद्घाटन केले. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू, यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.जुन्या काळातला करमणूक ठेवा नव्या तंत्रज्ञानात लोकांसमोर आणण्यासाठी या मंचाची निर्मिती करण्यात आली आहे. वेव या मंचाच्या माध्यमातून रामायण, महाभारत, शक्तीमान आणि हमलोग सारख्या मालिका पुन्हा पाहता येणार आहे. इतर ओटीटी मंचापेक्षा वेव वैशिष्ट्यपूर्ण असेल, असं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सैगल म्हणाले. वेव द्वारे १२ भाषांतले १० प्रकारचे कार्यक्रम प्रसारित करण्यात येणार आहेत. अयोध्येतल्या राम मंदिरातल्या आरतीचे थेट प्रसारण, त्याचप्रमाणे मन की बातही प्रसारित केली जाईल. वेवने हिंदी, इंग्रजी, बंगाली, मराठी, कन्नड, मल्याळम, तेलगू, तमिळ, गुजराती, पंजाबी, आसामी यासह 12 पेक्षा जास्त भाषांमधील आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनासह भारतीय संस्कृतीचा पुरस्कार करणाऱ्या सर्वसमावेशक भारतीय कथांसह एक मोठा समूह म्हणून OTT मंचावर प्रवेश केला आहे. वेवने FTII, अन्नपूर्णा, AAFT यासारख्या चित्रपट आणि माध्यम प्रशिक्षण संस्थांच्या विद्यार्थ्यांनी आपल्या पदवी पूर्व वर्षात बनवलेल्या चित्रपटांसाठीही आपले पोर्टल उपलब्ध केले आहे.

******